# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :- २/एनजीसी/अधिसूचना/२०१२/२०३२
दिनांक : ६ डिसेंबर, २०१२

## अधिसूचना

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे [Advt.No.:Approval/09/(3)/2012] परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅण्डबुक मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन-लाईन पध्दतीने अर्ज दि. ३०/०९/२०१२ ते दि. ३१/१२/२०१२ पर्यन्त मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जांवर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता www.dte.org.in/courseapproval2013 ही लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि. ३१.१२.२०१२ पर्यंत माहिती भरावयाची आहे. संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑन-लाईन पध्दतीने माहिती सादर केलेल्या संस्थानाच सुनावणीकरीता बोलाविण्यात येईल व त्यानुसार संचालनालयाचे अभिप्राय शासनामार्फत परिषदेस कळविण्यात येतील. सुनावणी संबंधिचे वेळापत्रक वेळावेळी संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध करुन देण्यात येईल. संबंधित संस्थांनी सुनावणीस उपस्थित राहतांना परिषदेस सादर केलेला सहपत्रासह अर्ज, ॲनेक्चर - सी व परिषदेचा डेफिसिअन्सी रिपोर्ट (प्राचार्यांनी प्रमाणित केलेला) इत्यादी सह उपस्थित रहाणे आवश्यक राहील यांची नोद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन )
प्र. संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सहसंचालक तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक ...11630...
दिनांक - 7 DEC 2012

अतितात्काळ

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तंशिस / प्राकाना / शैवि—३ / २०१२ / 3583
दि. 10 DEC 2012

प्रति,
सर्व प्राचार्य,
पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका यांना
माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर

D:\kedare\notification 2013.doc